शिवसेना-भाजपा युती

विधानसभा निवडणूक २००९

# माझे सरकार...

# माझा वचननामा!

# लक्ष्यवेधी वचननामा !

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार !

- राज्यात शिवशाही स्थापन होताच शेतकऱ्यांनी घेतलेले सर्व थकित कर्ज व्याजासहित माफ.
- शेतमजुरांना ६५ वयानंतर जन्मभर दरमहा रु. ५००/- पेन्शन देणार.
- शेती कर्जे ४ टक्के दरात देणार.

## महाराष्ट्राला २४ तास परवडणारी वीज देणार !

- अनेक पध्दतीने वीज निर्मिती करणार. तीन वर्षात महाराष्ट्र भारनियमन मुक्त करणार.
- संपूर्ण मुंबईत एकाच दराने वीजपुरवठा करणार.
- २४ तास वीजपुरवठा करणार.

## रास्त किमतीत जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करणार !

- भ्रष्टाचार बंद करण्यासाठी जनतेला थेट लाभ देणारी 'फूड स्टॅम्प' ही योजना लागू करणार.
- गहू, तांदूळ, तुरडाळ, गोडेतेल व साखर या पाच अत्यंत महत्त्वाच्या वस्तूंचे दर स्थिर करणार.

## सज्ञान व समर्थ महाराष्ट्रासाठी !

- सर्व मुला-मुलींकरीता १० वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याची बांधिलकी.
- संपूर्ण महाराष्ट्र साक्षर करणार.
- १ लाख शिक्षकांची भरती करणार.
- नॅकच्या धर्तीवर शालेय शिक्षणाची गुणवत्ता यादी तयार करुन यशस्वी शिक्षण संस्था / मुख्याध्यापक / शिक्षक यांच्यासाठी 'पुरस्कार योजना' राबविणार.

## आरोग्यपूर्ण महाराष्ट्रासाठी !

- गरीबांच्या शस्त्रक्रिया मोफत आणि मध्यमवर्गीयांना निम्म्या दरात उपलब्ध करुन युती सरकारच्या काळातील 'जीवनदायी' योजना अधिक व्यापकपणे व प्रभावीपणे राबविणार.
- आरोग्य साक्षरता वाढविणार.
- आरोग्य सेवेतील सर्व रिक्तपदे भरणार.

...२...

- अपघात आणि दुर्घटनेत जायबंदी झालेल्या रुग्णांवर प्रथम उपचार आणि नंतर कायदेशीर सोपस्कार व्हावेत याकरीता शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांकरीता विशेष यंत्रणा राबविणार.
- मुंबईसह प्रगत शहरे आणि जिल्ह्यांमध्ये अर्ध्या तासात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी तातडीने यंत्रणा कार्यान्वित करणार.

## पाणी म्हणजेच जीवन !

- घराजवळ आवश्यक तेवढे शुध्द पेयजल मिळण्यासाठी 'शिवजीवन' योजना राबविणार.
- समुद्राचे पाणी गोडे करुन मुंबईकरांसाठी 'शिवशाही पेयजल' योजनेमार्फत उपलब्ध करणार.

## भूमिपुत्रांसाठी परवडणारी घरे !

- परवडणाऱ्या किंमतीत घरे मिळू शकतील असे गृहनिर्माण धोरण तयार करणार.
- ग्रामीण भागात घरासाठी ७५ हजारांचे अनुदान व शहरात ५ लाख रुपयांत सदनिका मिळावी अशी योजना तयार करणार.
- अखंड महाराष्ट्र झोपडीमुक्त करण्यासाठी सर्वांना परवडणारी घरे देणार.

## महिलांचा सामाजिक व आर्थिक विकास !

- शिवशाहीचे सरकार असताना पारित झालेल्या महिला विकास धोरणाची पुरेपूर अंमलबजावणी करणार.
- 'लाडकी लेक' या योजनेद्वारा मुलीचा जन्म होताच तिच्या नावे सरकार ठेव ठेवेल व तिला १८ व्या वर्षी एक लाख रुपये मिळणार.
- महिला बचत गटातील सदस्य महिलांना वयाची ६५ वर्षे पूर्ण होताच दरमहा ५०० रु. पेन्शन देणार.

## युवकांसाठी राष्ट्रीय गुंतवणूक !

- उच्च शिक्षणासाठी गरजूंना, कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाच्या आधारे ४ टक्के कर्ज वितरणाची योजना राबविणार.
- ग्रामीण रोजगार हमी योजनेप्रमाणे शहरी रोजगार हमी योजना सुरु करणार.

## महाराष्ट्र विकासाचे मार्ग !

- रखडलेले रेल्वे मार्ग पूर्ण करण्याकरीता रेल्वे बोर्डाच्या सहकार्याने कालबध्द कृती योजना राबविणार.
- मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाप्रमाणे मुंबई-नाशिक, मुंबई-कोकण, नाशिक-संभाजीनगर-नागपूर, नाशिक-पुणे या महामार्गांची कामे त्वरेने सुरु करणार.
- जास्त वहातुकीचे जिल्हा मार्ग चारपदरी करणार.

## मुंबईच्या विकासासाठी व्हिजन २०१४ !

- शिवशाहीच्या काळात नेमलेल्या अफझलपुरकर समितीने दिलेल्या अहवालानुसार मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावणार.
- मुंबईतील नोकरी व जागा गमावलेल्या गिरणी कामगारांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र योजनेद्वारे भरघोस आर्थिक मदत.
- वांद्रे-वरळी सागरी सेतु नरिमन पॉईंट पर्यंत नेणार.
- वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बहुमजली तसेच भुयारी रस्ते व रेल्वे निर्माण करणार.

## असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी !

- ग्रामीण रोजगार हमी योजनेप्रमाणे शहरी रोजगार हमी योजना सुरु करणार.
- ठेलेवाले, घरकाम करणारे, सायकल रिक्षा चालविणारे, रोजंदारी करणारे, हातगाडीवाले, छोट्या दुकानात काम करणारे मजूर, गुमास्ता कायदा लागू नसणारे श्रमिक व ज्यांना पेन्शन मिळत नाही असे असंघटित मजूर व तत्सम असुरक्षित समाजघटकांना वृद्धापकाळात सहाय्यभूत ठरेल अशी पेन्शन योजना राबविणार.
- ऊसतोड कामगार आणि वाहतूक कामगारांच्या हिताचे संरक्षण करणारा विशेष कायदा करणार.

## आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन !

- महाराष्ट्रात अनेक बंद पडत असलेल्या छोट्यामोठ्या उद्योगांसाठी आवश्यक त्या मूलभूत सोयी जिथल्या तिथे (ऑन दी स्पॉट) मिळवून देणार.
- यशस्वी मोठ्या खाजगी उद्योजकांना आजारी उद्योगांचे पुनर्वसन करण्याकरिता नवीन नियम आणि सवलतींची अंतर्भूत असलेली योजना कार्यान्वित करणार.
- महाराष्ट्रातील आणि खास करुन 'ड' वर्गातील महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक विकासासाठी देशभरात कुठेही नसलेला पण महाराष्ट्रात असलेला जकात कर आणि टोल रद्द करणार.

## महाराष्ट्राच्या उध्दारासाठी सामाजिक न्याय !

- भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतांमध्ये होणारा दूषितपणा टाळण्यासाठी राज्यात उत्तम शौचालयाची सुविधा निर्माण करण्यासाठी १०० टक्के अनुदान देणार.
- जातीचे व उत्पन्नाचे दाखले मिळण्यासाठी असलेली पद्धत सोपी करणार.
- आदिवासींना ते कसत असलेल्या जमिनींचे मालकी हक्काचे पट्टे देणार.

...४...

## रोजगार व स्वयंरोजगार !

- ८० टक्के नोकऱ्या स्थानिक कुशल व अकुशल बेरोजगारांना देण्यात याव्यात याकरिता आमचे सरकार कठोर अंमलबजावणी करणार.
- ग्रामीण भागातील पारंपरिक बलुतेदारांना व्यवसायासाठी ४ टक्के दराने कर्ज उपलब्ध करणार.

## अपंगांच्या विकासासाठी मदत अभियान !

- शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंगांसाठी मंत्रालयात स्वतंत्र खाते निर्माण करणार.
- अपंग, अंध, मानसिक रुग्ण यांचेसाठी सूत्रबद्ध नियोजन करुन 'मदत अभियान' सुरु करणार.

## पोलीस-जवान व न्याय व्यवस्था !

- पोलिसांच्या कुटुंबीयांना निवारा, शिक्षण, प्रशिक्षण इ. सुविधा जास्तीत जास्त सवलतीच्या दरात मिळण्यासाठी योग्य योजना अंमलात आणणार.
- कर्तव्य बजावताना हुतात्मा होणारे पोलीस आणि देशासाठी शहीद होणाऱ्या महाराष्ट्रातील जवानांच्या कुटुंबीयांना २५ लाख रुपये मदत व सरकारी नोकरीत प्राधान्य देणार.

## महाराष्ट्राची अस्मिता !

- मुंबईमध्ये साकार होणारे शिवरायांचे स्मारक येत्या पाच वर्षांत पूर्ण करुन उपनगरात 'शिवसृष्टी' निर्माण करणार.
- मराठी भाषेचा वापर वाढावा म्हणून २१ फेब्रुवारी (जागतिक मातृभाषा दिन) ते २७ फेब्रुवारी (जागतिक मराठी दिन) असा 'मराठी आठवडा' साजरा करण्यासाठी कायदा करणार.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी !

- महाराष्ट्र विधिमंडळाने पूर्वी ज्येष्ठ नागरिकांची उतारवयात काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्या मुलांवर अनिवार्यपणे टाकली होती. त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करणार.
- नगरपालिका क्षेत्रात 'आजी-आजोबा पार्क' निर्माण करणार.

## कला, क्रीडा व संस्कृती !

- प्रत्येक जिल्ह्यामध्ये हजारो वर्षांची परंपरा असणाऱ्या विठ्ठल भक्तांसाठी 'वारकरी भवन' उभारणार.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आणि ऑलिम्पिकमध्ये पात्र ठरणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होऊन यशस्वी होण्याकरीता संपूर्ण मदत करणार.

## पर्यटन विकासातून स्वयंरोजगार !

- सागरी, साहसी, धार्मिक, आरोग्य, प्रेरणा अशा सर्व प्रकारच्या पर्यटनाला गती देणाऱ्या धोरणाद्वारे महाराष्ट्राला जगाच्या पर्यटन नकाशावर मानाचे स्थान मिळवून देणार.
- ३५० शिवकालिन दुर्गम गड किल्ल्यांचा विकास करुन देशविदेशातील इतिहास प्रेमी आणि गिर्यारोहकांना सोय उपलब्ध करुन 'दुर्ग पर्यटन योजना' विकसित करणार.

## वन संवर्धन व उत्पादन !

- 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या योजनेखाली मोठ्या प्रमाणावर बंधाऱ्यांची कामे घेतली जातील.
- तालुका स्तरावर वनखात्यांच्या औषधी वनस्पतीच्या रोपवाटिका स्थानिकांच्या सहभागातून तयार करुन लोप पावत चाललेल्या आयुर्वेदास पुनरुज्जीवन मिळवून देणार.

## योग्य प्रशासकीय कारभारासाठी !

- शिवशाही सरकार प्रदूषण करणाऱ्या कुठल्याही प्रकल्पाला मान्यता देणार नाही.
- शिवशाही सरकारच्या वचननाम्याच्या पूर्ततेसाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग स्थापन करणार.
- निवडून आल्यावर विकासाची आणि जनहिताची कामे न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना परत बोलविण्याचा जनतेला हक्क देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरावे अशी कार्यप्रणाली तयार करणार.
- युतीचे मुख्यमंत्री व्हिडियो कॉन्फरन्सद्वारा जनतेशी संवाद साधणार.
- सर्वसामान्य नागरिकांचे मंत्रालयाचे हेलपाटे कमी करण्यासाठी 'ई-गव्हर्नन्स' चा दुसरा टप्पा सुरु करणार.

## अन्य !

- पुणे विमानतळाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक असे नाव देणार.
- विविध विकास कामांमुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या नागरिकांसाठी जमीन, नोकरी, नुकसान भरपाई, निर्वाह भत्ता, प्रशिक्षण, विकास प्रकल्पातील भागीदारी, विकसित जमिनीचा हिस्सा, घर, पाणी इत्यादिंबाबत हक्क आणि आवश्यक सुविधा मिळण्यासाठी विशेष योजना राबविणार.
- सर्व समाजातील गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गातील विद्यार्थ्यांना आर्थिक निकषावर शिक्षणात व युवकांना रोजगारात आरक्षण देणार.
- सार्वजनिक वाहतुक प्रदूषण मुक्त करण्यासाठी विशेष योजना राबविणार.

# विधानसभेवर भगवा फडकणारच !

प्रिय मतदार बंधू भगिनींनो,

ज्या क्षणी निवडणुकीची तारीख जाहीर झाली तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये एक उत्साहाची, चैतन्याची लाट उसळली. ज्या क्षणाची आपण वाट पहात होतो तो क्षण जवळ आला आहे असे सर्वसामान्य जनतेला वाटते.

१९९५ ते १९९९ या काळात शिवशाहीची राजवट होती. या राजवटीत आम्ही महाराष्ट्राचा कायापालट करण्यासाठी अनेक धाडसी निर्णय घेतले. कृष्णा खोरे प्रकल्पासोबतच पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी भरपूर निधी दिला व चांगल्या योजनांना विदर्भ-मराठवाडा-कोकण येथे सर्वत्र सुरूवात केली. महाराष्ट्र टँकरमुक्त करण्यास शुभारंभ केला. नागरिकांचे जीवन सुखाचे व्हावे म्हणून मुंबईत ५५ उड्डाणपूल बांधले. मुंबई-पुणे प्रवास वेगाने होऊन उद्योगधंद्याचे जाळे मजबूत व्हावे यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग बांधला. शिवशाहीच्या पाचही वर्षात एकही जातीय दंगल होऊ दिली नाही, बाँबस्फोट करण्याची एकाही अतिरेक्याची हिंमतच झाली नाही. शेतीमालाला भाव, शेतकऱ्यांसाठी विमा यासारखे निर्णय शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रत्यक्षात आणले. शिवशाही सरकार सत्तेत होते तेव्हा आम्ही पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवले. स्त्रियांसाठी स्वतंत्र न्यायालये सुरु केली. शेतकऱ्यांना शासकीय कचेऱ्यातून ७/१२ चा उतारा घरपोच मिळावा व सामान्यांना सर्वच कागदपत्रे सहजरित्या मिळावित यासाठी धडाडीने निर्णय घेतले. शेतकरी - कामगार - युवक - महिला या सर्वांना सुखाने जगता यावे यासाठी अनेक योजना सुरू केल्या.

या उलट गेल्या दहा वर्षांत काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आघाडी सरकारने संपूर्णपणे कपाळकरंटा कारभार केला. महाराष्ट्रात ठिकठिकाणी बाँबस्फोट झाले. अतिरेकी कारवायांना सरकारचे संरक्षण मिळाले. बँक, स्टँप, औषधे, धान्य अशा सर्व विषयात कोट्यवधी रुपयांचे घोटाळे झाले. स्त्रियांवर अत्याचार-बलात्कार करणारे गुंड-पुंड यांना काँग्रेसचे संरक्षण मिळाले. दुष्काळाची हाताळणी गलथानपणे झाली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांच्या या मृत्यूंसोबतच माणुसकीला कलंक लावणाऱ्या कुपोषणामुळे आदिवासी बालकांचेही मृत्यू झाले. हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महत्त्वाच्या शहरांप्रमाणे अनेक जिल्ह्यांत दंगली झाल्या. रेल्वेसह मालेगाव आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर २००८ रोजी दक्षिण मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये बॉम्बस्फोट झाले. अनेक देशी-विदेशी नागरिकांचे प्राण गेले. आपल्या अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि जवानांना प्राणांची आहुती द्यावी लागली ही भीषण वस्तुस्थिती आहे.

आमच्या मते ही निवडणूक म्हणजे एक युद्धच आहे, त्याहीपेक्षा महाराष्ट्राच्या जनतेचा हा स्वातंत्र्यलढा आहे. स्वातंत्र्य केवळ परक्यांपासून मिळते अशातला भाग नाही, तर जुलमी आणि न्याय न देणारं सरकार हे स्वकीयांचे असेल तर त्यापासून मुक्ती मिळवणं हा देखील एक स्वातंत्र्यलढाच आहे. सततचे भारनियमन, त्यात वीजदर वाढीची भीती आणि आता दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, यामुळे निष्क्रिय आघाडी सरकारच्या विरोधात सर्वसामान्य जनतेमध्ये चीड निर्माण झाली आहे. सार्वजनिक जीवनामध्ये वाढलेला भ्रष्टाचार, सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, सर्व सामान्यांच्या घरांचा प्रश्न, यामुळे शहरातील चाकरमान्यांपासून ते अगदी गावातील लहान-मोठे सर्व शेतकरी त्रस्त झालेले आहेत.

त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीत मुंबईत मराठी उमेदवारांच्या झालेल्या पराभवाबद्दल आता सर्वसामान्य जनतेच्या मनात पश्चात्तापाची भावना निदर्शनास येऊ लागली आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विभाजित झालेली मते पुन्हा एकदा युतीकडे येण्याचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसी राजवटीला कंटाळलेली आपल्यासारखी जनता १३ ऑक्टोबर २००९ रोजी आघाडीच्या विरोधात मतदान करुन वचन पाळणाऱ्या आपल्या शिवशाही सरकारास विजयी करण्याकरीता कटीबद्ध झाली आहे.

आम्हांला पूर्ण खात्री आहे की, विधानसभेवर भगवा फडकणारच ! पण त्याकरीता शहरापासून गावापर्यंत पसरलेल्या आणि या महाराष्ट्रावर निष्ठा ठेवणाऱ्या मतदारांना आम्ही इतके सांगू इच्छितो की कुठल्याही भूलथापांना बळी पडू नका, आपापसात भांडू नका, एकजूट कायम ठेवा. कारण आता जर चुकाल तर नशीब फुटल्याशिवाय राहणार नाही. मराठी मते फुटली तर ज्यांना तुम्ही मतदान कराल ते तर निवडून येणार नाहीतच, पण काँग्रेस आणि राष्ट्रवादी पुन्हा डोक्यावर बसतील. आणि हे जर डोक्यावर बसले तर आपल्याला पुन्हा फक्त न्याय मागण्यासाठी आंदोलने, सभा, मोर्चे याशिवाय हातात काही राहणार नाही.

गेल्या तीन वर्षांपासून आम्ही जी आंदोलने केली, मोर्चे नेले, सभा-संमेलने आयोजित केली, महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात दौरे केले. या काळात ज्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा आपल्यासारख्या जनतेने आमच्याकडे व्यक्त केल्या त्या सर्वांचे संचित म्हणून **'माझे सरकार, माझा वचननामा!'** ही पुस्तिका प्रकाशित करीत आहोत; आणि आपल्याशी वचनबद्ध होत आहोत. आम्ही तुम्हांला खात्रीने सांगतो की, मागील शिवशाही सरकारच्या काळात आम्ही **शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे** यांना दिलेल्या शब्दाप्रमाणे जसा युतीचा कारभार केला, तसाच दिलेला शब्द आणि तुम्हाला दिलेले वचन सर्वतोपरी पाळणारच आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताची जपणूक करुन विकासाचे राजकारण करणार. तुम्ही फक्त एकच गोष्ट करायची, आपापसातली एकजूट कायम ठेवा. आपल्यात फूट पाडणाऱ्यांना खड्यासारखे वेचून बाजुला टाका आणि स्वाभिमानाने, मजबुतीने, एकजुटीने मराठी माणसांचा, हिंदुत्वाचा, शिवरायांचा पवित्र भगवा विधानसभेवर फडकवा.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**उद्धव ठाकरे**
शिवसेना कार्यप्रमुख

**नितिन गडकरी**
प्रदेशाध्यक्ष, भाजपा

**गोपीनाथ मुंडे**
राष्ट्रीय सरचिटणीस, भाजपा

# माझे सरकार...
# माझा वचननामा!

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार !

- राज्यात शिवशाही स्थापन होताच शेतीकरीता शेतकऱ्यांनी घेतलेले सर्व थकित कर्ज व्याजासहित माफ करुन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला जाईल.
- शेतकऱ्यांना खाजगी सावकारांच्या कर्जापासून मुक्ती देणार. शेतकऱ्यांना नाडणाऱ्या सावकारांचे परवाने (लायसन्स) रद्द करणार आणि दोषी सावकारांवर कठोर कारवाई करणार.
- बियाण्यात भेसळ करणारे व खतांचा काळाबाजार करणारे व्यापारी शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करणार.
- शेती उत्पन्नातील जोखमीचे व्यवस्थापन करण्यासाठी 'इरमा' योजना लागू करणार. कोणत्याही संकटामुळे शेतीचे नुकसान झाल्यास शेतकऱ्याला वर्षात होणारे उत्पन्न विचारात घेऊन तितकी नुकसान भरपाई विम्याद्वारे शेतकऱ्याला दिली जाईल.
- सर्व शेतमाल व कृषी उत्पादनांना रास्त व उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळावा अशी यंत्रणा उभी करणार. त्यामुळे पात्र (जिराईत व बागायती) शेतकऱ्यांना संपूर्ण आर्थिक संरक्षण मिळणार. स्वामीनाथन कमिशनच्या शिफारशीप्रमाणे उत्पादन खर्च अधिक ५० टक्के असा भाव मिळण्यासाठी आग्रह धरणार.
- विधीमंडळात कोणतेही विधेयक मांडताना त्या विधेयकाचा शेतकऱ्यांवर कोणता परिणाम होईल ते नमूद केले जाईल.
- शेतकरी आंदोलनातील शेतकऱ्यांवरील सर्व खटले काढून घेणार.
- सेझ (SEZ) साठी शेतजमिनी संपादित केल्या जाणार नाहीत व करु दिल्या जाणार नाहीत.
- संपूर्ण राज्यात सिंचन सुविधा पुरविण्यासाठी अर्थसंकल्पात जादा तरतूद करणार. दरवर्षी रोजगार हमी योजनेतून व विशेष अनुदानातून एक लाख शेततळ्यांची निर्मिती करणार.
- पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, रेशीम उत्पादन आणि मत्स्यव्यवसायाकरिता अर्थसंकल्पात भरीव तरतूद करणार आणि या व्यवसायाना प्रोत्साहन देणार.
- शेतमजुरांचे शोषण थांबविण्यासाठी उपाययोजना करुन त्यांचे वार्षिक उत्पन्न सुरक्षित करणार. शेतमजुरांना ६५ वयानंतर जन्मभर दरमहा रु. ५००/- पेन्शन देणार.
- शेतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- लँड रेकॉर्ड पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल करुन सातबारा उताऱ्यात होणारे फेरफार आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी साधी सरळ व पारदर्शक पध्दत राबविणार.
- छोट्या भूधारक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करुन त्यांच्या मुलांना सर्व क्षेत्रात ५ टक्के जागा राखीव

ठेवणार. एक एकर आणि त्यापेक्षा कमी शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना बि-बियाणे, खते/औजारे इ.खरेदीमध्ये विशेष सवलत देणार.

- शेती पंपासाठी विजेची मागणी करणाऱ्या प्रलंबित पाच लाख शेतकऱ्यांना एक वर्षात कनेक्शन देण्यात येतील. त्यानंतर अर्ज केल्यावर एक महिन्यात कनेक्शन मिळणार.
- शेती कर्जे ४ टक्के दरात देणार.
- जैविक खतांच्या वापरास प्रोत्साहन देणार.
- खतांची उपलब्धता व साठवणीची सोय वाढविणार.
- ठिबक व तुषार सिंचन सबसिडी एक महिन्यात मिळणार.
- अपुरे सिंचन प्रकल्प ३ वर्षांत पूर्ण करणार.
- नियंत्रित दराने पशुखाद्य उपलब्ध होणार.
- दूध साठवणुकीसाठी कुलिंग प्लांटची साखळी करणार.

## महाराष्ट्राला २४ तास परवडणारी वीज देणार !

- सर्व वीज प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्याजोगे करणार. प्रगतीपथावरील प्रकल्प शीघ्रगतीने पूर्ण करणार. इथेनॉल, बायोगॅस व अपारंपारीक पध्दतीने वीजनिर्मिती वाढविणार.
- तीन वर्षात महाराष्ट्र भारनियमन मुक्त करणार.
- वीज वितरणातील गळती व चोरी कमी करुन तोटा कमी करणार व त्याचा लाभ ग्राहकांना देणार. वीज चोरी करणाऱ्यांना तुरुंगात पाठविणार.
- मुंबईत व अन्य सर्व शहरातील वीज बिले अवाजवी रीतीने वाढवू दिली जाणार नाहीत. उपनगरासहित संपूर्ण मुंबईत एकाच दराने वीजपुरवठा करणार.
- 'सिंगल फेजिंग प्रणाली' शीघ्र गतीने १०० टक्के पूर्ण करणार.
- घरगुती वीजपुरवठा राज्यभरात २४ तास करणार.

## रास्त किमतीत जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करणार !

- सार्वजनिक वितरण प्रणालीत बोकाळलेला भ्रष्टाचार बंद करण्यासाठी जनतेला थेट लाभ देणारी 'फूड स्टॅम्प' ही योजना लागू करणार. या योजनेअंतर्गत दरमहा लागणारे अन्नधान्य व अन्य जीवनावश्यक वस्तू विकत घेण्यासाठी जनतेला योग्य किंमतीची कुपने वितरीत करणार. या कंपन्यांच्या बदल्यात

लोक आपल्याला हव्या त्या जीवनावश्यक वस्तू कोणत्याही दुकानातून घेऊ शकतील. या क्रांतिकारक योजनेमुळे जनतेला थेट मिळणाऱ्या लाभातून मोठा आधार मिळेल व महाराष्ट्रातील कोणीही आबालवृध्द अर्धपोटी राहणार नाही.

- सर्वसामान्य जनतेचा अल्पोपहार म्हणून सुप्रसिध्द असलेले पदार्थ उदा. वडापाव, मिसळ, थालीपीठ, पोहे, पुरणपोळी इ. तसेच पारंपरिक उपवासाचे पदार्थ करविरहित करणार.
- पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव पाच वर्षांसाठी स्थिर ठेवून १९९५ ते १९९९ या काळात युती सरकारने जनतेला मोठा आधार दिला होता. तीच योजना आताही कार्यान्वित करुन गहू, तांदूळ, तुरडाळ, गोडेतेल व साखर या पाच अत्यंत महत्त्वाच्या वस्तूंचे दर राज्य सरकारच्या आर्थिक पाठिंब्याने स्थिर करणार. धान्य कुपने व पाच वस्तूंचे स्थिर भाव या दोन कार्यक्रमांचा मेळ घालून महाराष्ट्राच्या सर्व जनतेला अभूतपूर्व अन्नसुरक्षा मिळवून देणार.

## सज्ञान व समर्थ महाराष्ट्रासाठी !

- मुलींना पदवीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाईल.
- सर्व मुला-मुलींकरीता १० वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याची बांधिलकी प्रामाणिकपणे जपणार. पुढील पाच वर्षात संपूर्ण महाराष्ट्र साक्षर करणार.
- शालेय शिक्षणाची गुणवत्ता सर्व अंगांनी विकसित करण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण पध्दतीमध्ये अभ्यासक्रम आणि परीक्षा पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल करुन विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नवे शैक्षणिक धोरण तयार करणार.
- शालेय शिक्षणात संगणकाचा वापर, क्रीडा-कला या विषयांप्रमाणेच व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम आणि 'करीअर' मार्गदर्शनाचा समावेश करणार.
- महाविद्यालयीन प्रवेशासाठी पुढील पाच वर्षांसाठी एकच धोरण राबविणार व हे करताना भौगोलिक अंतर, गुणवत्ता व विद्यार्थी-पालकांच्या आशा आकांक्षा विचारात घेणार.
- महाराष्ट्र एस.एस.सी. बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा हक्क जपला जाईल.
- कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान सुरु करण्याचे धोरण राबविणार. मात्र त्याचबरोबर खाजगी संस्थांनी चालविलेल्या शाळा व महाविद्यालयांमधील फी वाढीवर शासकीय नियंत्रण आणणार.
- अंध, अपंग, मूकबधिर मुलांच्या शिक्षण हक्कासाठी असलेल्या योजना कार्यान्वित करण्याबरोबरच या वंचित मुलांच्या पुनर्वसनासाठी योग्य तो निधी उपलब्ध केला जाईल. या विद्यार्थ्यांसाठी अस्तित्वात असलेल्या शालेय धोरणांचा पुनर्विचार होईल. त्याचबरोबर बाल गुन्हेगारांसंबंधीच्या कायद्याची फेररचना करण्यात येईल.

- महाराष्ट्रात बालमजुरी नष्ट होण्यासाठी प्रतिबंध व नियमन कायदा (१९८६) ची कडक अंमलबजावणी करु. तसेच सर्वांना हक्काचे शिक्षण मिळावे यासाठी माजी शिक्षण श्री. सुधीर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कृती गटाच्या शिफारशी अंमलात आणल्या जातील.
- ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांसह पिण्याचे पाणी, शौचालये यांची पूर्णतः सुविधा उपलब्ध केली जाईल.
- नॅकच्या धर्तीवर शालेय शिक्षणाची गुणवत्ता यादी तयार करुन यशस्वी शिक्षण संस्था / मुख्याध्यापक / शिक्षक यांच्यासाठी 'पुरस्कार योजना' राबविणार.
- ग्रामीण आणि शहरी भागातील शाळांमधून गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि व्यवसायाभिमुख शिक्षणाचा पुरस्कार करण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांकरीता समुपदेशन केंद्रे सुरु करणार.
- वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणेच इतर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शासनाच्या सहकार्याने 'इटर्नशिप' योजना सुरु करणार.
- प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे दप्तरांचे ओझे कमी करणार.
- आयटीआयचे तातडीने आधुनिकीकरण करुन आयटीआय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या होतकरु तरुणांना मोठे उद्योजक, दत्तक योजनेंतर्गत सामावून घेतील अशी यंत्रणा आणि योजना अंमलात आणणार.
- जिल्हापरिषद, नगरपरिषद, महानगरपालिका येथील सार्वजनिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष उपक्रम.
- एक लाख शिक्षकांची भरती, सध्याच्या शिक्षकसेवकांना पात्रतेनुसार सामावून घेण्यात येईल.
- अध्यापक, प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यात येतील.
- घड्याळी तास पध्दती बंद करुन त्यांना अर्धवेळ नियुक्त्या देण्यात येतील.

## आरोग्यपूर्ण महाराष्ट्रासाठी !

- राज्यातील सर्व ग्रामीण व शहरी शासकीय रुग्णालयांच्या इमारतींचे नूतनीकरण करुन, सर्व केंद्रे वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज करुन व आवश्यक तेवढे डॉक्टर, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि त्यांची निवास व्यवस्था करुन जनतेला सर्व तऱ्हेच्या आरोग्य सेवा सुलभतेने उपलब्ध करुन देणार.
- राज्यातील रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सर्व प्रमुख रस्त्यांवर 'ट्रॉमा' केंद्रे उभारली जातील.
- गरीबांच्या शस्त्रक्रिया मोफत आणि मध्यमवर्गीयांना निम्म्या दरात उपलब्ध करुन युती सरकारच्या काळातील 'जीवनदायी' योजना अधिक व्यापकपणे व प्रभावीपणे राबविणार.

- आदिवासी विभागातील व अन्य बालकांचे कुपोषण थांबविण्यासाठी 'नवसंजीवन' योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल.
- शासकीय अनुदानासहित 'आरोग्य वीमा योजना' सर्वांपर्यंत पोहोचविली जाईल.
- फिरत्या दवाखान्यांची सोय सर्वदूर निर्माण केली जाईल.
- वैद्यकीय शिक्षणासाठी कोकण व मुंबई येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी तसेच दंत महाविद्यालयांची निर्मिती करणार.
- अपघात आणि दुर्घटनेत जायबंदी झालेल्या रुग्णांवर प्रथम उपचार आणि नंतर कायदेशीर सोपस्कार व्हावेत याकरीता शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांकरीता विशेष यंत्रणा राबविणार. पोलीस नियमावलीत योग्य ते बदल करणार.
- डॉक्टरांनी खेड्यात जावे यासाठी काही पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम जिल्ह्या-जिल्ह्यातून राबविणार आणि स्थानिक वैद्यकीय पदवीधारकांना प्राधान्य देणार.
- स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी महसूल विभागीय स्तरावर चाचणी निदान केंद्रांची त्वरित निर्मिती करणार.
- मुंबईसह प्रगत शहरे आणि जिल्ह्यांमध्ये अर्ध्या तासात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी तातडीने यंत्रणा कार्यान्वित करणार.
- 'शुध्द पाणी-बंद गटारे-कचऱ्याची विल्हेवाट' या त्रिसुत्रीद्वारा सार्वजनिक आरोग्याचा पाया भक्कम करणार.
- सर्व बालकांचे १०० टक्के लसीकरण करणार.
- आरोग्य साक्षरता वाढविणार.
- आरोग्य सेवेतील सर्व रिक्तपदे भरणार.

## पाणी म्हणजेच जीवन !

- समुद्राचे पाणी गोडे करुन मुंबईकरांसाठी 'शिवशाही पेयजल' योजनेमार्फत उपलब्ध करणार.
- राज्यात सर्वत्र घराजवळ आवश्यक तेवढे शुध्द पेयजल मिळण्यासाठी 'शिवजीवन' योजना राबविणार.
- गंगा नदीच्या धर्तीवर महाराष्ट्रात नदी शुध्दीकरण योजना राबविणार.
- पिण्याच्या किंवा शेतीच्या पाण्याचे खाजगीकरण होऊ दिले जाणार नाही.
- युध्द पातळीवर संपूर्ण महाराष्ट्र टँकरमुक्त केला जाईल.
- गावतळी, शेततळी व पर्जन्यजल साठवणूक योजनांचा धडक कार्यक्रम राबविणार.

- प्रत्येक गावात पिण्याचे पाणी मिळालेच पाहिजे म्हणून गावाकडून घेतल्या जाणाऱ्या १० टक्के लोकवर्गणीसाठीसुद्धा शासनाच्यावतीने कर्ज देण्यात येईल.
- मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये जो काही मुबलक पाऊस पडतो त्या पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करुन अवर्षणग्रस्त आणि दुष्काळी भागात त्याची साठवण व वितरण योग्य पद्धतीने होईल अशा पद्धतीची यंत्रणा उभारण्याकरिता पुढाकार घेतला जाईल.
- सुधारित प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबवून सर्वत्र पाणी शुध्दीकरण व जीवन प्राधिकरणाचे पुनरुज्जीवन.

## भूमिपुत्रांसाठी परवडणारी घरे !

- मागील १० वर्षांत गरीब व मध्यमवर्गीयांच्या घरांच्या प्रश्नांकडे संपूर्ण दुर्लक्ष झाल्यामुळे लक्षावधी लोक शहरे व खेड्यांमध्ये 'घर-घर' करीत आहेत. या सर्वांसाठी ३०० चौरस फूटांची ग्रामीण व शहरी गृहनिर्माण योजना युध्दपातळीवर हाती घेणार.
- शहरांमधून मोडकळीस आलेल्या इमारती, रखडलेले झोपडपट्टी विकास प्रकल्प व इतर गृह समस्यांनी हताश झालेल्या रहिवाश्यांसाठी पुढील पाच वर्षांत समाधानकारक कार्यक्रम राबविणार.
- सर्व जुन्या घरकुलांच्या जागी अधिक मोठ्या आकाराची घरे विनामूल्य मिळणाऱ्या योजना तयार करणार.
- नवीन सदनिका विकत घेणाऱ्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे मिळू शकतील असे गृहनिर्माण धोरण तयार करणार. ग्रामीण भागात घरासाठी ७५ हजाराचे अनुदान व शहरात ५ लाख रुपयांत सदनिका मिळावी अशी योजना तयार करणार.
- गृहनिर्माण क्षेत्रातील भ्रष्टाचार निपटून काढून पारदर्शक कारभार देणार.
- मुंबईप्रमाणेच महाराष्ट्रातील सर्वच शहरांमध्ये घरे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. शिवशाहीच्या सरकारने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमार्फत अनेकांना घरे दिली त्याप्रमाणे अखंड महाराष्ट्र झोपडीमुक्त करण्यासाठी शिवशाही सरकार सर्वांना परवडणारी घरे देण्याचा पुरेपुर प्रयत्न करणार.

## महिलांचा सामाजिक व आर्थिक विकास !

- शिवशाहीचे सरकार असताना पारित झालेल्या महिला विकास धोरणाची पुरेपूर अंमलबजावणी करणार.
- महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, हुंडाबळी, अल्पवयीन मुलींचे अपहरण करुन वेश्याव्यवसायात ढकलणे, स्त्री गर्भहत्या असे गुन्हे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार.
- महिलांचा सामाजिक व आर्थिक विकास व्हावा, त्यांना सन्मान व सुरक्षा मिळावी, रोजगाराची संधी मिळावी यासाठी योजना आखण्यात येतील.

- पित्याच्या संपत्तीमध्ये त्याचबरोबर कोणतीही कायमस्वरुपी मालमत्ता खरेदी करताना पुरुषांबरोबर महिलांचे नांव समाविष्ट करणे अनिवार्य करणार.
- शिधावाटप केंद्रात होणारा भ्रष्टाचार, भेसळ, साठेबाजी यांना आळा घालण्यासाठी स्वस्त धान्य दुकानांची वाटप यंत्रणा महिला बचतगटांकडे देण्यासंदर्भात योजना राबविणार आणि त्यांना ४ टक्के दराने कर्ज उपलब्ध करणार.
- महिला बचत गटातील सदस्य महिलांना वयाची ६५ वर्षे पूर्ण होताच दरमहा ५०० रु. पेन्शन देणार.
- 'लाडकी लेक' या योजनेद्वारा मुलीचा जन्म होताच तिच्या नावे सरकार ठेव ठेवेल व तिला १८ व्या वर्षी एक लाख रुपये मिळतील.

## युवकांसाठी राष्ट्रीय गुंतवणूक !

- राष्ट्रीय धोरणानुसार १३ ते ३५ वयोगटातील सर्व व्यक्ती युवा आहेत. अशा युवकांना आमचे शासन शिक्षण प्रशिक्षणाची तरतूद देणार.
- वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा तत्सम शिक्षणावर आकारली जाणारी भरमसाट फी कमी करणार.
- उच्च शिक्षणासाठी गरजूना कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाच्या आधारे ४ टक्के कर्ज वितरणाची योजना राबविणार.
- बचतगट योजना तरुणांसाठी अमलात आणणार, तसेच तरुणांना शासनाच्या जिल्हापरिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीतील ठेके अग्रक्रमाने देणार.
- अतिरेकी विरोधी शिक्षणाचे खास प्रशिक्षण वर्ग सरकार व खाजगी संस्थांतर्फे सुरु करण्यात येतील.
- शिवशाही सरकार केंद्राकडे पाठपुरावा करुन महाराष्ट्रात आयआयएम संस्था सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार.
- महसूल विभागाची पडीक जमीन भूमिहीन बेरोजगार स्थानिक युवकांना वार्षिक भाडेतत्त्वावर देण्यात येणार.
- रोजगार शोधण्याच्या काळात तीन वर्षासाठी दरमहा ८०० रुपये रोजगार साहाय्य भत्ता देणार.
- ग्रामीण रोजगार हमी योजनेप्रमाणे शहरी रोजगार हमी योजना सुरु करणार.

## महाराष्ट्र विकासाचे मार्ग !

- अनेक वर्ष रखडलेले रेल्वे मार्ग पूर्ण व्हावेत म्हणून विशेष पुढाकार घेऊन रेल्वे बोर्डाच्या सहकार्याने कालबध्द कृती योजना राबविणार.

- मुंबई-पुणे हा देशातील पहिला द्रुतगती मार्ग शिवशाहीनेच केला. त्यानंतर रेंगाळलेल्या मुंबई-नाशिक, मुंबई-कोकण, नाशिक-संभाजीनगर-नागपूर, नाशिक-पुणे या महामार्गांची कामे त्वरेने सुरु करुन वेगाने पूर्ण करणार.
- महाराष्ट्रातील मध्यम आकाराची बंदरे व जलवाहतुकीचा विकास या दुर्लक्षित विषयाकडे प्राधान्याने लक्ष देणार. १० मध्यम आकाराच्या बंदरांची निर्मिती सुरु करणार.
- सर्व ग्रामीण व शहरी रस्त्यांची सुधारणा आधुनिक पध्दतीने अंमलात आणणार.
- जास्त वहातुकीचे जिल्हा मार्ग चारपदरी करण्यात येतील.

# मुंबईच्या विकासासाठी व्हिजन २०१४ !

- नागरी सुविधांवर पडणारा बोजा कमी करण्यासाठी मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबवण्यासाठी एक कायमस्वरुपी यंत्रणा उभारणार.
- शिवशाहीच्या काळात नेमलेल्या अफझलपुरकर समितीने दिलेल्या अहवालानुसार मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावणार.
- धारावीच्या विकासाकरिता धारावीमधील प्रत्येक झोपडपट्टी मालकाला कमीत कमी ४०० चौ. फूट जागा उपलब्ध करुन छोट्या छोट्या उद्योगधंद्यांना संरक्षण देणार.
- मुंबईला पाणीपुरवठा करणारी धरणे अपुरी पडत असल्यामुळे कोकणातील नद्यांवर धरणे बांधून (उदा. गारगाई, पिंजाळ धरणांचा विकास करुन) त्यांचे पाणी मुंबईकडे आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करणार.
- मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी **व्हिजन २०१४** तयार करुन झोपडपट्टी, जुन्या चाळी (बी.डी.डी. आणि बी. आय.टी. चाळी), वाहतूक यासारखे सर्व प्रश्न शिवशाही सरकारच्या पाच वर्षांच्या काळात पूर्णपणे सोडविण्यात येतील.
- मुंबईतील विमानतळ परिसर सर्व सुख-सुविधा आणि वाहतूक संपर्काच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय दर्जाचा बनविण्यासाठी आपले सरकार, केंद्रसरकार आणि विमानतळ प्राधिकरणाशी पाठपुरावा करुन त्यांच्या जागेवर असलेल्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करुन तेथील परिसर विकसित करण्याकरिता प्राधान्य देणार.
- मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी अंगिकारलेल्या विविध उपक्रमांमुळे उदा. फ्लायओव्हर्स, द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण, मेट्रो रेल्वे, सागरी सेतू मार्ग इत्यादिंमुळे विस्थापित झालेल्या रहिवाश्यांचे पुनर्वसन होण्यासाठी त्यांना अधिक एफएसआय उपलब्ध करुन देणार.
- मुंबईतील नोकरी व जागा गमावलेल्या गिरणी कामगारांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र योजनेद्वारे भरघोस आर्थिक मदत.
- मुंबईसाठी काम करणाऱ्या सर्व संघटनांच्या कामांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी सर्व प्रकल्पांवर नियंत्रक संस्था म्हणून महापालिकेकडे अंतिम अधिकार व जबाबदारी देणार.

- देवनार पशुवधगृहातून कत्तल केलेल्या प्राण्यांचे मांस परदेशी पाठविले जाते. ही निर्यात बंद केली जाईल.
- वांद्रे-वरळी सागरी सेतु नरिमन पॉईंट पर्यंत नेणार.
- मुंबईसाठी दुसरा विमानतळ बनविण्यासाठी पुढाकार घेणार.
- वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बहुमजली तसेच भुयारी रस्ते व रेल्वे निर्माण करणार.

## असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी !

- असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी सर्वंकष कायदा करणार.
- शासनाच्या सार्वजनिक उद्योगांच्या खाजगीकरणास आळा घालून आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन करणार.
- नोकरदार कामगारांच्या मुळांवर येणारी कंत्राटी कामगार पद्धत बंद करुन सर्व क्षेत्रातील कामगारांचे हित जपणारे धोरण अंमलात आणणार.
- ठेलेवाले, घरकाम करणारे, सायकल रिक्षा चालविणारे, रोजंदारी करणारे, हातगाडीवाले, छोट्या दुकानात काम करणारे मजूर, गुमास्ता कायदा लागू नसणारे श्रमिक व ज्यांना पेन्शन मिळत नाही असे असंघटित मजूर व तत्सम असुरक्षित समाजघटकांना वृद्धापकाळात सहाय्यभूत ठरेल अशी पेन्शन योजना राबविणार.
- ऊसतोड कामगार आणि वाहतूक कामगारांच्या हिताचे संरक्षण करणारा विशेष कायदा करणार.

## आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन !

- महाराष्ट्रात अनेक बंद पडत असलेल्या छोट्यामोठ्या उद्योगांसाठी आवश्यक त्या मूलभूत सोयी जिथल्या तिथे (ऑन दी स्पॉट) मिळवून देणार.
- बंद पडलेल्या आजारी लघुउद्योगांसाठी 'पुनर्वसन' योजना आखण्यात येईल.
- महाराष्ट्रातील आणि खास करुन 'ड' वर्गातील महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक विकासासाठी देशभरात कुठेही नसलेला पण महाराष्ट्रात असलेला जकात कर आणि टोल रद्द करणार.
- भौगोलिक परिस्थितीनुसार उपलब्ध स्थानिक कच्चा माल, पिढ्यान पिढ्या चालत आलेली कारागिरी यांची सांगड घालणारी यंत्रणा निर्माण करणार.
- सुस्तावलेल्या एमआयडीसीतील बंद पडलेले उद्योजकांचे गाळे/जमिनींचा ताबा घेऊन ज्या तरुणांना उद्योगात उतरण्याची इच्छा आहे अशांना सवलतीच्या दरांत सदर जमिनी/गाळे उपलब्ध करण्याची योजना कार्यान्वित करणार.

- यशस्वी मोठ्या खाजगी उद्योजकांना आजारी उद्योगांचे पुनर्वसन करण्याकरिता नवीन नियम आणि सवलतींची अंतर्भूत असलेली योजना कार्यान्वित करणार.

## महाराष्ट्राच्या उध्दारासाठी सामाजिक न्याय !

- भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतांमध्ये होणारा दूषितपणा टाळण्यासाठी राज्यात उत्तम शौचालयाची सुविधा निर्माण करण्यासाठी १०० टक्के अनुदान देणार.
- भटके व विमुक्तांच्या विकासासाठी घटनेमध्ये स्वतंत्र तिसरे शेड्युल करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल. आणि 'रेणके आयोगा'च्या अंमलबजावणीसाठी आग्रह धरणार.
- आदिवासींसाठी जंगल व पडिक जमिनीचे नियोजन करुन त्यांच्या उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन त्यांना मूळ प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी योजना राबविणार.
- आदिवासींना ते कसत असलेल्या जमिनींचे मालकी हक्काचे पट्टे देण्यात येतील.
- जातीचे व उत्पन्नाचे दाखले मिळण्यासाठी असलेली पद्धत सोपी केली जाईल.
- दलितांच्या व्यक्तिगत व सामूहिक लाभाच्या योजना अधिक उपयुक्त बनविण्याकरीता लोकसंख्येच्या प्रमाणात योजनांच्या पूर्ततेकरीता निधी राखून ठेवला जाईल.
- विविध धार्मिक स्थळे, मठ, मंदिरे, प्रार्थनालये इ. ठिकाणी भक्तांना आणि गरिबांना दिला जाणारा प्रसाद आणि भोजनावरील कच्च्या मालाच्या खरेदीवरील कर रद्द करुन संबंधित संस्थांना सवलत देणार.
- भूमिहीनांना जमीन देण्याच्या शासकीय निर्णयाअंतर्गत भूमिहीन बेरोजगारांना विशेष प्राधान्य देणार.
- राज्यातील सर्व स्तरातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढवून ज्याप्रमाणे गुजरात सरकारने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या संख्येत घट केली त्याप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासी, दलित, भटके, विमुक्त आणि इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार आणि आरोग्य सेवा या क्षेत्रात शिवशाही सरकार विशेष योजना राबविणार.

## रोजगार व स्वयंरोजगार !

- महाराष्ट्रात ८० टक्के नोकऱ्या स्थानिक कुशल व अकुशल बेरोजगारांना देण्यात याव्यात याकरिता आमचे सरकार कठोर अंमलबजावणी करेल.
- शिर्डी येथे यशस्वी ठरलेल्या मळापासून गॅस व वीज निर्मिती करणारे प्रकल्प इतरत्र राबविण्यासाठी आणि पर्यावरणाच्या जपणूकीसाठी असंख्य युवकांना रोजगारांच्या संधी देणाऱ्या या उद्योगास प्राधान्य दिले जाईल.

- भूमिपुत्रांनी नोकरीच्या बेड्यांमधून बाहेर पडावे आणि स्वयंरोजगार करु पाहणाऱ्या तरुणांनी सर्व अटींची पूर्तता केल्यास एक महिन्याच्या आत कर्ज, जागा, भांडवल पुरवले जाईल.
- ग्रामीण भागातील पारंपरीक बलुतेदारांना व्यवसायासाठी ४ टक्के दराने कर्ज उपलब्ध करणार.

## अपंगांच्या विकासासाठी मदत अभियान !

- शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंगांना त्यांचे मूलभूत मानवाधिकार बहाल करणार तसेच त्यांना शासकीय व खाजगी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणार.
- शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंगांसाठी मंत्रालयात स्वतंत्र खाते निर्माण करणार.
- अपंग, अंध, मानसिक रुग्ण यांचेसाठी सूत्रबद्ध नियोजन करुन 'मदत अभियान' सुरु करणार.

## पोलीस-जवान व न्याय व्यवस्था !

- पोलीस दलातील शिपायांचे मनोबल वाढविण्यासाठी एकूण सेवाकालात दोन वेळा पदोन्नती देणार.
- व्यावसायिकांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी कार्यक्षम निवृत्त पोलिसांची नेमणूका केलेले सुरक्षा महामंडळ स्थापन करणार.
- मुंबईसह इतर प्रगत शहरांच्या कारभारासाठी नवीन पोलीस ठाणी निर्माण करणार.
- पोलीस दलास उत्तम शस्त्रसामुग्री देऊन अधिक सक्षम, सजग करण्याकरिता त्यांना ठरावीक तासांचा कार्यकाल ठरवून देण्यात येईल. पोलीस दलात जास्तीत जास्त तरुणांची भरती करणार आणि गस्तीवरील पोलिसांच्या संख्येत वाढ करणार.
- पोलिसांच्या कुटुंबीयांना निवारा, शिक्षण, प्रशिक्षण इ. सुविधा जास्तीत जास्त सवलतीच्या दरात मिळण्यासाठी योग्य योजना अंमलात आणणार.
- अतिरेकी संघटनांच्या व नक्षलवाद्यांच्या वाढत्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी, इतर देशातून सागरीमार्गे आणि सीमा भेदून होणारी घुसखोरी टाळण्यासाठी एटीएस/वैद्यकीय सेवा विभाग/सुरक्षा रक्षक दलांचा उपयोग करुन मुंबईसह पुणे, नाशिक सारख्या मेट्रो शहरामध्ये 'टायगर फोर्स' या नावाने १० हजार पोलीसांचे राखीव दल तैनात करणार.
- कर्तव्य बजावताना हुतात्मा होणारे पोलीस आणि देशासाठी शहीद होणाऱ्या महाराष्ट्रातील जवानांच्या कुटुंबीयांना २५ लाख रुपये मदत व सरकारी नोकरीत प्राधान्य देणार.
- महाराष्ट्रातील माजी सैनिकांच्या गरजा लक्षात घेऊन 'जयजवान योजना' राबविणार.

- मुंबई ही देशाची औद्योगिक राजधानी असल्यामुळे न्यायप्रविष्ठ खटल्यांमध्ये रोज शेकडोंनी वाढ होत असते, म्हणून जलद न्यायदानाकरीता मुंबईत सुमारे २०० आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी तालुक्याप्रमाणे ३ ते ५ न्यायालयांची निर्मिती करणार.
- जलदगतीने सदर यंत्रणा अंमलात आणल्यास मोठ्या संख्येने मराठी होतकरु तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. याकरिता आवश्यक असणारे शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना प्रोत्साहित केले जाईल.

## महाराष्ट्राची अस्मिता !

- रायगडावरील मेघडंबरीत शिवभक्तांनी बसविलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची शिवशाही सरकार नियमित पूजा सुरु करणार.
- माजी मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत इतिहासकार म.म.दत्तो वामन पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली लिहीण्यास सुरुवात केलेला 'शिवचरित्र ग्रंथ' पूर्ण करुन हा शासनाचा अधिकृत ग्रंथ आहे असे जाहीर करणार.
- मुंबईमध्ये साकार होणारे शिवरायांचे स्मारक येत्या पाच वर्षांत पूर्ण करुन उपनगरात 'शिवसृष्टी' निर्माण करण्यात येईल. स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची वचने असलेली स्वातंत्र्य ज्योत उभारण्यात येईल.
- धार्मिक स्थळांचे व सर्व किल्ल्यांचे पावित्र्य टिकवण्यासाठी व जतन करण्यासाठी कठोर पावले उचलली जातील.
- मुंबईतील मिठी नदीप्रमाणे ओशिवरा, पोईसर, दहिसर नद्यांचे मार्ग दुरुस्त करुन नाल्यांतील घाण, कचरा काढून नद्या शुद्ध करणार. त्याचबरोबर महाराष्ट्रातील गोदावरीसारख्या नद्या ज्या महाराष्ट्रातील जनतेच्या सांस्कृतिक-सामाजिक विकासाचा भाग आहे, अशा गंगानदीप्रमाणे पवित्र नद्या पहिल्या तीन वर्षात शुद्ध करणार.
- राज्यभाषेचा वापर वाढावा म्हणून केंद्र सरकार 'हिंदी पंधरवडा' साजरा करते, हिंदीचा वापर करण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी बक्षिसे देते. आपल्या सरकारच्या काळात २१ फेब्रुवारी (जागतिक मातृभाषा दिन) ते २७ फेब्रुवारी (जागतिक मराठी दिन) असा 'मराठी आठवडा' साजरा करण्यासाठी कायदा करणार.
- विविध शासकीय, निमशासकीय आणि खाजगी क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांमध्ये युवकांना इंग्रजी व हिंदी भाषेसह मराठी भाषेतून परीक्षा देण्याची सोय करणार.
- सन १९६४ च्या 'केंद्र व राज्य सरकारी कामकाज १०० टक्के मराठीत करण्याच्या कायद्या'नुसार युतीने राज्यसरकारचा कारभार ५० टक्क्यांपर्यंत नेऊन ठेवला आहे. तो आपल्या सरकारच्या काळात १०० टक्क्यांवर नेण्यासाठी ५ वर्षात सर्वोतोपरी प्रयत्न करणार.

- मराठीचा पूर्ण वापर केल्याने महाराष्ट्राचे काहीही अडू नये, यासाठी 'भाषांतर महामंडळाची' स्थापना केली जाईल. जगातील सर्व अद्ययावत ज्ञान, जे प्रामुख्याने जर्मन, फ्रेंच, रशियन भाषांत आहे, व ज्या ज्या अन्य भाषांमध्ये असेल, ते मराठीत भाषांतरित करण्याचे काम हे महामंडळ करेल. यासाठी केंद्रशासनाचा २००० कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध असतो, तो यापूर्वीच्या सरकारांनी मागितला नाही. मात्र सत्तेवर येताच या भाषा विकास निधीतून विज्ञान-तंत्रज्ञान-वैद्यकीय व अन्य ज्ञानाची गंगा मराठीत आणली जाईल.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी !

- प्रत्येक जिल्ह्यात एक तरी वृद्धाश्रम असावा ही शिवशाहीतील कल्पना पूर्णपणे अमलात आणली जाईल. सर्व सुख-सोयी देण्याकरीता विशेष सवलती देऊन वृद्धाश्रम विकसित करणार.
- महाराष्ट्र विधिमंडळाने पूर्वी ज्येष्ठ नागरिकांची उतारवयात काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्या मुलांवर अनिवार्यपणे टाकली होती. त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात येईल.
- वृध्दांना सर्वोतोपरी आधार ठरणाऱ्या योजना उदा. पेन्शन, विमा आणि आरोग्य सुविधा सुलभपणे त्यांना मिळण्यासाठी आधार केंद्रे स्थापन करणार.
- नगरपालिका क्षेत्रात 'आजी-आजोबा पार्क' निर्माण करणार.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी सार्वजनिक ठिकाणी विशेष सोयी व ज्येष्ठ नागरिक संरक्षण मंच निर्माण करणार.

## कला, क्रीडा व संस्कृती !

- प्रत्येक जिल्ह्यामध्ये हजारो वर्षांची परंपरा असणाऱ्या विठ्ठल भक्तांसाठी 'वारकरी भवन' उभारणार.
- भटके विमुक्तांच्या व आदिवासींच्या पारंपरिक व सांस्कृतिक कला जतन करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी 'स्वातंत्र्यसैनिक उमाजी नाईक' स्मरणार्थ पारंपरिक कला केंद्र स्थापन करण्यात येईल.
- शिवशाही सरकारच्या काळात महाराष्ट्रातील नाट्य, संगीत याबरोबरच विविध जिल्ह्यातील पारंपरिक कला, क्रीडेचे जतन व संवर्धन व्हावे याकरीता पु.ल. देशपांडे अकादमी आणि क्रीडा प्रबोधिनीच्या तत्त्वावर प्रत्येक जिल्ह्यात संदर्भ ग्रंथालये, संगीत, प्रकाश इ. सादरीकरणाच्या सोयींसह सुसज्ज केंद्रे आणि खेळाची मैदाने निर्माण करणार.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आणि ऑलिम्पिकमध्ये पात्र ठरणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होऊन यशस्वी होण्याकरीता संपूर्ण मदत करणार.

# पर्यटन विकासातून स्वयंरोजगार !

- मुंबई शहरात जलचर प्राणी आणि सृष्टीचा आनंद लुटण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'सीवर्ल्ड' उभारणार.
- अभयारण्य क्षेत्राचा विकास आणि तेथील स्थानिक जनतेला उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून नैसर्गिक साधनसमृध्दी, आयुर्वेदिक औषधे, वन उत्पादने इत्यादिंपासून बनविलेल्या मालास बाजारपेठ निर्माण करणे आणि तेथील पर्यटनास चालना देऊन रोजगार निर्मितीकरिता सक्षम यंत्रणा तयार करणार.
- सागरी, साहसी, धार्मिक, आरोग्य, प्रेरणा अशा सर्व प्रकारच्या पर्यटनाला गती देणारे धोरण याद्वारे महाराष्ट्राला जगाच्या पर्यटन नकाशावर मानाचे स्थान मिळवून देणार.
- विविध वनौषधी आणि फुला फळांनी बहरलेल्या सह्याद्रीच्या कुशीत आणि पवित्र नद्यांच्या संगमावर आयुर्वेदिक औषधोपचार शाखेला विकसित करुन केरळच्या धर्तीवर आरोग्य पर्यटन योजना विकसित करणार.
- ३५० शिवकालिन दुर्गम गड किल्ल्यांचा विकास करुन देशविदेशातील इतिहास प्रेमी आणि गिर्यारोहकांना सोय उपलब्ध करुन 'दुर्ग पर्यटन योजना' विकसित करणार.
- महाराष्ट्रातील सुप्रसिध्द धार्मिक स्थळे, ऐतिहासिक शहरे आणि सण व उत्सवानिमित्त दरवर्षी विविध जिल्ह्यांमध्ये होणाऱ्या वार्षिक कार्यक्रमांच्या ठिकाणी महाराष्ट्रातील नागरिकांसाठी रास्त व स्वस्त दरात निवास, भोजन, सार्वजनिक स्नानगृहांच्या सोयींसहीत **महाराष्ट्र भवन** उभारणार.
- आदिवासी क्षेत्रात उदा.भीमाशंकर, मेळघाट, तोरणमाळ इ.ठिकाणी सध्या वनखात्याने जे वन पर्यटन धोरण जाहीर केले आहे ते तातडीने अंमलात आणणार.

# वन संवर्धन व उत्पादन !

- महाराष्ट्रात विडी कारखाने उभारणाऱ्या विडी कारखानदारांना सर्व सोयीसवलती पुरविण्यात येतील.
- महाराष्ट्रातील तेन्दुपत्ता संकलन करणाऱ्या आदिवासींना सरसकट २०० रुपये (प्रति ७० पानाच्या १०० पुड्यास) भाव देण्यात येईल.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोह झाडांची लागवड करण्यास अनुदान देण्यात येईल. मोहफुलापासून दारु व पशुखाद्य व मोहफळांपासून खाद्यतेल आणि पडिक जमीनींवर जेत्रोफासारख्या इतर औषधी वनस्पतींची लागवड करुन बायोडिझेल बनविणाऱ्या उद्योगास चालना देण्यात येईल.
- 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या योजनेखाली मोठ्या प्रमाणावर बंधाऱ्यांची कामे घेतली जातील.
- पूर्वी लागवड केलेल्या परंतु जंगल वाढले नसलेल्या क्षेत्रात फेर लागवडची योजना अंमलात आणून स्थानिक होतकरु बेरोजगार तरुणांकरिता रोजगार निर्मिती केली जाईल.

- तालुका स्तरावर वनखात्यांच्या औषधी वनस्पतीच्या रोपवाटिका स्थानिकांच्या सहभागातून तयार करुन लोप पावत चाललेल्या आयुर्वेदास पुनरुज्जीवन मिळवून देण्यासाठी स्थानिकांना वन औषधीची लागवड करण्यासाठी विशेष योजना राबविणार.

## योग्य प्रशासकीय कारभारासाठी !

- शिवशाही सरकार प्रदूषण करणाऱ्या कुठल्याही प्रकल्पाला मान्यता देणार नाही.
- शिवशाही सरकार शेतजमिनींवर कोणताही सेझ प्रकल्प/उद्योगाला मान्यता देणार नाही.
- मुंबईसह महाराष्ट्रातील महानगरपालिकांमध्ये कुठलाही उपक्रम राबविण्यासाठी केंद्रीय संस्थांना महापालिकांची परवानगी घेणे आवश्यक करणार.
- शासकीय, निमशासकीय आणि जनहिताच्या प्रकल्पांसाठी राखीव असलेल्या जमिनींवर अतिक्रमण रोखण्यासाठी स्वतंत्र सक्षम दल उभे करणार.
- शिवशाही सरकारच्या वचननाम्याच्या पूर्ततेसाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग स्थापित करणार.
- शासनामार्फत राबविल्या जात असलेल्या सर्वच योजनांचा आमचे नवे शासन आढावा घेईल. राज्य विधिमंडळाच्या समित्यांमार्फत या योजनांचा विशिष्ट कालमर्यादेत आढावा घेतला जाईल. असा आढावा घेताना नवनवीन समित्यांचा आग्रह न धरता शक्य तेथे सर्व ठिकाणी यापूर्वी घेण्यात आलेले आढावे, समित्यांचे अहवाल इत्यादी विचारात घेतले जातील. कालबाह्य ठरलेल्या योजना बंद करण्यात येतील वा त्यात कालानुरुप बदल करण्यात येतील.
- आज घडीला राज्यातील २७ महामंडळे तोट्यात असून त्यांचा एकूण तोटा रु.५ हजार ५६० कोटी एवढा आहे. राज्यावर आर्थिक ताण आणणाऱ्या महामंडळांच्या उपयुक्ततेचाही आढावा आमचे नवे शासन घेईल. कालबाह्य ठरलेली महामंडळे बंद करण्यात येतील.
- आमचे नवे शासन केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाबाबत जागरुक राहील. राज्यातील विशिष्ट परिस्थितीमुळे केंद्राची योजना राबविण्यात अडचणी असतील तर त्याबाबत केंद्राकडे पाठपुरावा करुन योजनेच्या नियम व निकषांमध्ये शिथिलता मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील. केंद्र शासनाच्या योजनांचा नियमितपणे आढावा घेऊन केंद्राचा निधी परत जाणार नाही यासाठी प्रयत्न केले जातील.
- शिवशाही सरकार प्रत्येक खात्याच्या मंत्र्यांचे प्रगती पुस्तक तयार करणार. वचननाम्यामध्ये ठरलेल्या योजना आणि ठरलेल्या उपक्रमाचा कालावधी पहिल्या तीन महिन्यात नक्की करुन दरवर्षी वचननाम्याच्या पूर्तीचा आढावा घेणार.
- शिवशाही सरकारच्या काळात राज्यातील महत्त्वाची विकास कामे, महामार्ग रस्ते निर्मितीची कामे करणाऱ्या ठेकेदारांकडून पाच वर्षांची हमीपत्रे घेणार. एक ते दीड वर्षांच्या काळामध्ये सदर कामे

हलक्या दर्जाची आढळून आल्यास आणि त्याचा लाभ घेणाऱ्यांना त्रास झाल्यास ठेकेदारांना दंड आकारणार आणि असे वारंवार करणाऱ्या ठेकेदारांना कायमस्वरुपी बाद ठरविणार.

- निवडून आल्यावर विकासाची आणि जनहिताची कामे न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना परत बोलविण्याचा जनतेला हक्क देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरावे अशी कार्यप्रणाली तयार करणार.
- चुकार शासकीय अधिकाऱ्यांना कडक शिक्षा आणि विकास योजनांची पूर्तता करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरस्कार देणारी योजना अंमलात आणणार.
- युतीचे मुख्यमंत्री व्हिडियो कॉन्फरन्सद्वारा जनतेशी संवाद साधणार.
- सर्वसामान्य नागरिकांचे मंत्रालयाचे हेलपाटे कमी करण्यासाठी 'ई-गव्हर्नन्स' चा दुसरा टप्पा सुरु करणार.

## अन्य !

- मराठा समाजासहित आरक्षण न मिळणाऱ्या सर्व समाजातील गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गातील विद्यार्थ्यांना आर्थिक निकषावर शिक्षणात व युवकांना रोजगारात आरक्षण देणार.
- १० मोठ्या शहराभोवती सुनियोजित उपनगरांचा विकास करणार.
- विविध विकास कामांमुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या नागरिकांसाठी जमीन, नोकरी, नुकसान भरपाई, निर्वाह भत्ता, प्रशिक्षण, विकास प्रकल्पातील भागीदारी, विकसित जमिनीचा हिस्सा, घर, पाणी इत्यादिंबाबत हक्क आणि आवश्यक सुविधा मिळण्यासाठी विशेष योजना राबविणार.
- दारिद्र्य रेषेखालील नागरिकांचे बँक खाते उघडण्यासाठी एक हजार रुपयांचे अनुदान देणार.
- २००८ पर्यंतची गुंठेवारी नियमित करणार.
- शासकीय सबसिडी, मदत, पेन्शन, मानधन अशा सर्व रकमा १ तारखेला बँक खात्यात जमा करणार.
- पुणे विमानतळाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक असे नाव देणार.
- वारंवार वहातुक नियमांचा भंग करणाऱ्या चालकांचे लायसन्स रद्द करणारा नवा कायदा आणणार.
- रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी विशेष योजना आखणार.
- सार्वजनिक वाहतुक प्रदूषण मुक्त करण्यासाठी विशेष योजना राबविणार.

-------ooo-------